दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शनिवार दि.१४ मार्च २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १९६ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Saturday 14 March 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 196 | Pages 4 | Rate 4 Rs

## जनगणनेत ओबीसींचा वेगळा रकाना टाकावा

**मुंबई**–केंद्र सरकारने जनगणनेची घोषणा केली आहे पण त्यात ओबीसीसाठी रकाना नाही.ओबीसी जनगणना होणार अशी घोषणा असताना ओबीसी साठी वेगळा रकाना नाही. ओबीसी लोकसंख्या किती आहे हे स्पष्ट झालं नाही तर त्यांना त्यांचे अधिकार मिळणार कसे? त्यामुळं राज्य सरकारने केंद्र सरकारकडे याबाबत पाठपुरावा करावा, पत्रव्यवहार करून जनगणनेत ओबीसींचा वेगळा रकाना करण्याची मागणी करावी अशी भूमिका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.अर्थसंकल्पातील विभागावर चर्चेत सहभागी होताना वडेट्टीवार यांनी ओबीसी समाजाचे प्रश्न मांडले. ओबीसींची संख्या ५० टक्के असताना महाज्योतीला ३०० कोटी आणि इतर संस्थांनाही ३०० कोटी, हे धोरण अन्यायकारक आहे. पीएचडी विद्यार्थ्यांना देखील पाठ्यवेतन देण्यात आलेलं नाही. ओबीसी विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रशिक्षणाकडे देण्यात येत आहे पण विद्यार्थ्यांची मागणी ऑफलाईन प्रशिक्षणाची आहे.विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी प्रति विद्यार्थी ५० हजार ते १ लाख रुपये खर्च केले जात आहेत, तरीही ८५ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रशिक्षणाकडे पाठ फिरवली आहे.

# ई-रिक्षा व ई-बाईकसाठीही परमिट बंधनकारक करण्याचा सरकारचा निर्णय:परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती




दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

राज्यात रिक्षा आणि टॅक्सींसाठी नवीन परमिट देण्याची प्रक्रिया गेल्या दोन दिवसांपासून तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. तथापि, प्रवासी वाहतूक करणाऱ्या ई-रिक्षा व ई-बाईकनां यापुढे मोटार वाहन विभागाकडे रितसर नोंदणी करुन परवाना घेणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की,आतापर्यंत इलेक्ट्रिक रिक्षांना (ई-रिक्षा) प्रवासी वाहतुकीसाठी स्वतंत्र परमिट घेण्याची सक्ती नव्हती. मात्र, वाढत्या ई-वाहनांच्या संख्येचा विचार करता केंद्र शासन अधिसूचना क्र. का. आ. २८१२ (अ) दि. ३०/०६/२०१६ अन्वये प्रवासी वाहतुकीत एकसमान नियम लागू करण्यासाठी ई-रिक्षा व ई-बाईक साठीही परमिट (परवाना )प्रक्रिया बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. या निर्णयामुळे पारंपरिक रिक्षा, टॅक्सी आणि इलेक्ट्रिक रिक्षा या सर्व प्रकारच्या वाहनांसाठी समान नियम लागू राहतील. तसेच प्रवासी वाहतुकीच्या व्यवस्थेत पारदर्शकता वाढविणे आणि अनियमितता टाळणे हा यामागील उद्देश असल्याचे मंत्री सरनाईक म्हणाले.दरम्यान, परमिट प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी परिवहन विभागाकडून एक खिडकी योजना सुरू करण्याची तयारी सुरू आहे. या योजनेअंतर्गत अर्ज स्वीकारणे, कागदपत्रांची पडताळणी आणि मंजुरी प्रक्रिया एकाच ठिकाणी सुलभ पद्धतीने पार पाडली जाणार आहे. तथापि, कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार किंवा अनियमितता टाळण्यासाठी प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांसाठी परमिट घेणे अनिवार्य राहणार आहे. नवीन नियमानुसार इलेक्ट्रिक रिक्षा व ई-बाईकसाठीही परमिट घेणे आवश्यक राहील, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले आहे.या निर्णयामुळे प्रवासी वाहतुकीच्या व्यवस्थेत अधिक शिस्त येईल, नियमांचे पालन सुनिश्चित होईल आणि भविष्यात प्रवाशांना सुरक्षित व नियंत्रित सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.



## ९४ वर्षीय प्राचार्य वेदकुमार वेदालंकार यांनी केला मनाचे श्लोक पुस्तकाचा हिंदी अनुवाद

दैनिक वादळ वार्ता
**अंबाजोगाई | प्रतिनिधी**



प्रख्यात शिक्षणतज्ञ प्राचार्य वेदकुमार वेदालंकार यांनी समर्थ रामदास स्वामी यांच्या 'मनाचे श्लोक' या पुस्तकाचे (श्लोकाचे) हिंदी भाषेत अनुवाद केला आहे.हे पुस्तक श्री व सौ खुर्जेकर (विद्यानंद प्रकाशन पुणे) यांनी प्रकाशित केले असून सज्जनगड येथे प्रकाशन सोहळा संपन्न झाला.९४ वर्षीय वेदकुमार वेदालंकार यांनी याआधी तुकाराम गाथा,समग्र ज्ञानेश्वरी (१८ अध्याय) या ग्रंथाचा देखील हिंदी अनुवाद केला आहे. साधारणतः दोन वर्षापुर्वी वेदकुमार वेदालंकार यांच्या पत्नीचे निधन झाले.ते दुःख विसरून व ती पोकळी भरून काढण्यासाठी त्यांनी रामदास स्वामींच्या मनाचे श्लोक याचे पठण व मनन सुरू केले.याचा परिणाम असा झाला की, मनाला शांतता वाटू लागली मग त्यांच्या मनात विचार आला की, याचा हिंदी अनुवाद व्हायला हवा.यातील बारीक सारीक गोष्टी जलदगतीने पूर्ण झाल्या व अवघ्या काही महिन्यातच मनाचे श्लोक या पुस्तकाचा हिंदी अनुवाद डॉ.अदिती वेदालंकार भुसारी यांच्या मदतीने तयार झाला.व रामदास स्वामी यांच्या चरणी वेदालंकार यांची सेवा रुजु झाली असून त्यांनी हिंदी अनुवाद केलेल्या मनाचे श्लोक हे पुस्तक सज्जनगड येथे अर्पण केले आहे.परंडा तालुक्यालील डोणगांव च्या समर्थ शिष्य कल्याणस्वामी यांच्या समाधी चरणी देखील हा अनुवाद अर्पण केला आहे.जयहिंद ग्रुपच्या वतीने वेदकुमार वेदालंकार यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी प्राचार्य मेजर एस.पी. कुलकर्णी,सौ.अपर्णा कुलकर्णी,पियुष वेदालंकार,सौ.सायली वेदालंकार,सुमंत वेदालंकार सौ.मनीषा वेदालंकार,दिग्विजय वेदालंकार, प्रा.डॉ.गणेश पिंगळे,प्रा.रमेश सोनवळकर,पत्रकार राहुल देशपांडे आदी उपस्थित होते.

## अक्षय औसेकर जवळबनच्या पोलीस पाटीलपदी

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**



महसूल खात्याच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत जवळबन येथील अक्षय रवींद्र औसेकर यांची यश संपादन केल्यामुळे त्यांची जवळबनच्या पोलीस पाटील पदी निवड झाल्याचे आदेश उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे आणि तहसीलदार राकेश गिड्डे यांनी नुकतेच काढले असून,या निवडीबद्दल अक्षय औसेकर यांचे मित्र,परिवारातून सर्वत्र अभिनंदन होत आहे. अक्षय रविंद्र औसेकर यांच्या निवडीचे भारतीय जनता मजदुर संघाचे महाराष्ट्र सचिव धनंजय कुलकर्णी,मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील, श्रीराम शेटे,श्रीनिवास केजकर,शिवराज मुथळे, अनंत कोकिळ,प्रविण देशपांडे,समीर देशपांडे यांच्या सह मित्र परिवार यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## धुळे-सुरत महामार्गावर भीषण अपघात: सोनखांब उड्डाणपुलावर टँकर आणि आयशरची जोरदार धडक!



दैनिक वादळ वार्ता
**नमस्कार | दिपक गोसावी.**

धुळे-सुरत या राष्ट्रीय महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून, गुरुवारी रात्री १० वाजेच्या सुमारास सोनखांब येथील उड्डाणपुलावर टँकर आणि आयशर यांच्यात भीषण धडक झाली. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, सुदैवाने एक जण किरकोळ जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आयशर (क्रमांक चक १८ इन २९३०) आणि टँकर (क्रमांक त्र्या १२ इढ ६६१५) यांच्यात ही जोरदार धडक झाली. रात्रीची वेळ असल्याने आणि धडक मोठी असल्याने परिसरात मोठा आवाज झाला. या अपघातात जीवितहानी टळली असली तरी वाहनांचा चक्काचूर झाला आहे.अपघाताची माहिती मिळताच महामार्ग आपत्कालीन सेवा देणारी १०३३ रुग्णवाहिका तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. रुग्णवाहिकेतील वैद्यकीय पथकाचे डॉक्टर रवींद्र वळवी, हेल्पर सोमनाथ नाईक आणि चालक अजय वळवी यांनी वेळ न घालवता जखमी व्यक्तीवर घटनास्थळीच प्राथमिक उपचार केले. जखमीची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. महामार्गावरील वाढत्या रहदारीमुळे आणि उड्डाणपुलांवरील वेगामुळे असे अपघात वारंवार घडत असल्याने वाहनधारकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# केज तालुक्यातून आणखी दोन तरुणी बेपत्ता;एक अल्पवयीन

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**




केज तालुक्यातील दोन वेगवेगळ्या गावांमधून दोन तरुणी बेपत्ता झाल्याच्या घटना समोर आल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे. यामध्ये एक १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी तर दुसरी १९ वर्षीय तरुणी असल्याची माहिती पोलिसांकडून मिळाली आहे.तुकुचीवाडी येथील इयत्ता आठवीत शिक्षण घेणारी १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी बुधवार,दि.११ मार्च रोजी मध्यरात्री सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास घरातून बेपत्ता झाली. संबंधित मुलगी आई जवळ झोपलेली असताना रात्री तिचे वडील शेतातील पिकांची राखण करून घरी परतले असता मुलगी घरात नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.त्यानंतर कुटुंबीयांनी गावात तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला ; मात्र मुलगी कुठेही आढळून आली नाही.याप्रकरणी मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादी वरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध अज्ञात कारणासाठी अपहरण केल्याचा गुन्हा केज पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान,दुसरी घटना बोबडेवाडी येथे घडली आहे.दि.२८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० साडेपाच वाजण्याच्या सुमारास १९ वर्षीय तरुणी शेतमजुरांचे मजुरीचे पैसे देण्यासाठी गावात गेली होती.मात्र त्यानंतर ती परत घरी आली नाही.संबंधित तरुणीने नुकतीच बारावीची परीक्षा दिलेली असल्याची माहिती मिळाली आहे. कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला असता ती कुठेही आढळून न आल्याने तिच्या वडिलांनी केज पोलिस ठाण्यात मुलगी हरवल्याची तक्रार दाखल केली आहे.या दोन्ही प्रकरणांचा तपास पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम करीत आहेत. दरम्यान,तालुक्यातुन सलग दोन तरुणी बेपत्ता झाल्याच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये विविध चर्चा रंगू लागल्या आहेत.

# नवापूर एम.आय.डी.सी.मध्ये बनावट तूप बनवणाऱ्या कारखान्यावर छापा; १.४६ कोटींचा मुद्देमाल जप्त!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**



नंदुरबार जिल्हा पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेने नवापूर एम.आय.डी.सी. परिसरात एका बनावट तूप तयार करणाऱ्या कारखान्याचा पर्दाफाश केला आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी तब्बल १ कोटी ४६ लाख ५६ हजार ३७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, सुरत येथील एका संशयित आरोपीला ताब्यात घेतले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली होती की, नवापूर एम.आय.डी.सी. परिसरात बनावट तूप तयार करून त्याची मोठ्या प्रमाणावर विक्री केली जात आहे. या माहितीची शहानिशा करण्यासाठी पोलीस पथकाने अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांसह आणि पंचांच्या उपस्थितीत गुरुवारी (१२ मार्च) रोजी कारखान्यावर धाड टाकली.

छाप्यादरम्यान धक्कादायक वास्तव समोर आले आहे. कारखान्यात पाम तेल, वनस्पती तूप आणि विविध घातक रासायनिक पदार्थांचा वापर करून गाईच्या तुपासारखा रंग आणि वास निर्माण केला जात होता.
हे बनावट तूप खालील प्रसिद्ध वाटणाऱ्या ब्रँड्सच्या नावाने पॅक केले जात होते:
ओरा काऊ घी
शुभम प्रीमियम काऊ घी
लाभ काऊ घी
राधे कृष्णा काऊ घी.इत्यादी.
पोलिसांनी घटनास्थळावरून पाम तेल, बनावट तुपाने भरलेले डबे, मोठ्या स्टोरेज टाक्या, पॅकिंग आणि प्रिंटिंग मशीन्स, बॉयलर, इलेक्ट्रिक मोटर्स आणि गॅस सिलिंडर असा एकूण १ कोटी ४६ लाखाचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.या प्रकरणी राकेशभाई ईश्वरभाई भरतिया (वय ४७, राहणार . सुरत, गुजरात) याला अटक करण्यात आली आहे. मानवी आरोग्यास धोकादायक ठरणारे हे भेसळयुक्त तूप विनापरवाना बनवल्याबद्दल त्याच्यावर नवापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १२३, २७४ आणि अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही धडक कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. आणि अप्पर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोलीस उप निरीक्षक विकास गुंजाळ आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने फत्ते केली.
ग्राहक सावधान!
बाजारात तूप खरेदी करताना ब्रँडची खातरजमा करा. अत्यंत स्वस्त दरात मिळणारे तूप आरोग्यासाठी घातक असू शकते.

# तळोद्याचे अंबालाल साठे यांना राज्यस्तरीय 'आदर्श कार्यगौरव समाजरत्न पुरस्कार' जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे तळोदा येथील व्यक्तिमत्व अंबालाल चिंतामण साठे यांची 'राज्यस्तरीय आदर्श कार्यगौरव समाजरत्न पुरस्कार २०२६' साठी निवड करण्यात आली आहे. पुणे येथील प्रतिष्ठित ज्ञानसंकल्प सामाजिक संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने हा गौरव प्रदान करण्यात येणार आहे.
ज्ञानसंकल्प सामाजिक संस्था ही भारत सरकारच्या नीती आयोग आणि नेहरू युवा केंद्राशी संलग्न असून, विविध क्षेत्रांत प्रेरणादायी कार्य करणाऱ्या व्यक्तींची या पुरस्कारासाठी निवड केली जाते. अंबालाल साठे यांनी सामाजिक, उद्योग, कला आणि साहित्य क्षेत्रात केलेले कार्य भूषणावह असल्याचे नमूद करत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सदाशिव रणदिवे यांनी त्यांच्या निवडीची घोषणा केली आहे.या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन लवकरच भव्य स्वरूपात केले जाणार असून, राज्यातील नामवंत मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाईल. कार्यक्रमाचे स्थळ आणि दिनांक लवकरच निमंत्रण पत्रिकेव्दारे कळविण्यात येणार असल्याचे संस्थेचे प्रदेशाध्यक्ष रेवणनाथ देशमुख आणि कार्याध्यक्ष दिपक जाधव यांनी स्पष्ट केले आहे.

**तळोद्याच्या शिरपेचात मानाचा तुरा**

अंबालाल साठे यांच्या या निवडीमुळे तळोदा शहरासह नंदुरबार जिल्ह्याच्या सांस्कृतिक आणि सामाजिक वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष सुभाष भोसले, कायदेशीर सल्लागार ड. किरण लोंढे आणि संघटक प्रा. दिनेश पवार यांच्यासह तालुक्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



# संपादकीय

## जिल्ह्याजिल्ह्यांत नशामुक्तीचा संकल्प

भारत विकसित राष्ट्र बनविण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना समाज नशामुक्त असणे अत्यावश्यक आहे. तरुण पिढीला व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी आणि निरोगी समाज घडविण्यासाठी नशामुक्ती अभियान महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जनजागृती, समुपदेशन आणि सामूहिक प्रयत्नांमधूनच व्यसनमुक्त भारताचे स्वप्न साकार होऊ शकते.नशामुक्ती अभियान आपल्या भारत देशाच्या शतक महोत्सवी स्वातंत्र्याच्या वर्षापर्यंत विकसित भारत होण्यासाठी भारत सरकार प्रयत्नशील आहे. यासाठी देशातील सामाजिक परिस्थिती, पर्यावरणीय शाश्वतता, आर्थिक वाढ आणि सुशासन अशा विविध बाबींचा समावेश आहे. म्हणजे आपला देश एक विकसित राष्ट्र म्हणून ओळखला जाणार आहे; परंतु असे असले तरी त्या देशातील नागरिक नशामुक्त असले पाहिजेत तरच देश खऱ्या अर्थाने विकसित बनू शकतो. देशाच्या विकासासाठी नशामुक्ती होणे गरजेचे आहे. त्यासाठी देशात नशामुक्ती अभियानाच्या माध्यमातून प्रामाणिकपणे जनजागृती झाली पाहिजे. भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने १५ ऑगस्ट २०२० रोजी देशात नशामुक्ती भारत अभियान सुरू केले. प्रथम देशातील २७२ जिल्ह्यांत हे अभियान राबविण्याचे निश्चित करण्यात आले होते. सध्या ३७२ जिल्ह्यांमध्ये नशामुक्ती अभियान राबविले जात आहे. आपल्या देशात सन २०२१ मध्ये ७५२ जिल्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. उत्तर प्रदेश राज्यात सर्वात ७५ जिल्हे असून सर्वात कमी गोवा राज्यात २ जिल्हे आहेत, तर आपल्या महाराष्ट्र राज्यात ३६ जिल्हे आहेत. तेव्हा देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून प्रत्येक जिल्ह्यात नशामुक्ती अभियान राबविणे गरजेचे आहे.नशामुक्ती अभियानाचा मुख्य उद्देश मादक द्रव्यांपासून मुक्त करणे, तरुणाईला जागृत करणे आणि नशा व्यक्तींचे पुनर्वसन करणे ही आहेत. म्हणजे नशामुक्ती अभियान निरोगी जीवन आणि आनंददायी समाज घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. त्यासाठी देशातील तरुणाईमध्ये नशामुक्ती विषयी जनजागृती अतिशय महत्त्वाची आहे. काही ठिकाणी नशा करून गळफास घेतल्याची उदाहरणे आहेत. तसेच अपघात झालेले आहेत तरी सुद्धा आकस्मिक मृत्यूची नोंद केली जाते. बस डेपोच्या परिसरात, रेल्वे पटरी, पडीत इमारतीमध्ये, वस्ती नसलेल्या रस्त्याच्या बाजूच्या झुडपात, फुटपाथ, रेल्वे प्लॅटफॉर्मवर इत्यादी ठिकाणी नशा करणारी मुले व वृद्ध व्यक्ती पाहायला मिळतात. यासाठी देशातील प्रत्येक जिल्ह्यात नशामुक्तीसाठी जनजागृती झाली पाहिजे. त्यासाठी मादक द्रव्यांच्या सेवनामुळे होणारे वाईट परिणाम सुजाण नागरिकांना सांगावे लागतील. यामध्ये सामाजिक संस्था, शिक्षण संस्था, विविध स्वयंसेवी संस्था अशा संस्थांमार्फत जनजागृतीची मोहीम हाती घ्यावी. तसेच त्या आनुषंगाने विविध कार्यक्रम राबविण्यात यावेत. व्यसनाधीन झालेल्या नागरिकांचे सुद्धा योग्यप्रकारे समुपदेशन करून त्यांचे पुनर्वसन करण्यात यावेत. यातून निरोगी समाज कसा निर्माण करता येईल त्या दृष्टिकोनातून मादक द्रव्यांचे प्रमाण कमी कसे करता येईल, त्याप्रमाणे प्रयत्न करावा. यातून देशात निरोगी समाज निर्माण करता येईल. याचा चांगला परिणाम लोकांचे सरासरी आयुर्मान वाढण्याला मदत होणार आहे. याला कारण वैद्यकीय सेवा आणि पोषण आहार म्हणता येईल. याच्या जोडीला नशामुक्ती महत्त्वाची आहे. सध्या देशात मादक द्रव्यांचा विचार केल्यास यात तरुण पिढी जास्त आहारी गेलेली दिसत आहे. यामुळे विकसित भारत राष्ट्र कसे होणार? केवळ जनजागृती करून चालणार नाही, तर शासन पातळीवर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे. एकीकडे मादक द्रव्यांचे सेवन करण्यास प्रतिबंध करणे आणि दुसरीकडे शासन मान्य देशी दारूचे दुकान म्हणून मान्यता देणे. त्याला सुजाण नागरिकांनी विरोध केल्यास शासनाचा महसूल बुडतो अशी आरडाओरड सुरू केली जाते. मात्र यावरती कायदेशीरपणे प्रतिबंध होणे गरजेचे आहे. यासाठी सामूहिक जागृती, पथनाट्य व पोस्टर्स लावून जनजागृती केली जात आहे. काही ठिकाणी तरुण पिढी बरबाद होऊ नये म्हणून दुकाने बंद करण्याचा प्रयत्न सुद्धा झाला. दारूची दुकाने काही दिवस बंद करण्यात आली. मात्र काही दिवसांनी पुन्हा दारूची दुकाने सुरू करण्यात आली. मादक द्रव्यांच्या सेवनाने गंभीर आजार, मानसिकदृष्ट्या खचून जाणे, कर्जबाजारी, शारीरिक समस्या अशा अनेक समस्या निर्माण होत आहेत. ग्रामीण भागात अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत चालले आहेत. काही ठिकाणी मुलांना वडिलांच्या मादक द्रव्यांच्या सेवनाने शाळा शिकण्याची इच्छा असून सुद्धा घरची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे अर्धवट शाळा सोडून तुटपुंज्या पगारावर बारा तास काम करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे देशातील दारिद्र्य निर्मूलन होणार नाही. यात गरीब अधिक गरीब होत जाणार आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होत जाणार आहे. जर भारत सरकारला देश विकसित करायचा असेल तर ही आर्थिक दरी कमी करावी लागणार आहे. ज्या गरिबांसाठी योजना आहेत त्या गरिबांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. तसेच त्यांना त्यांच्या मूलभूत हक्कांची जाणीव करून द्यायला हवी.नशामुक्ती भारत अभियान राबविताना मादक द्रव्यांच्या सेवनाने जे दुष्परिणाम निर्माण होतात त्याची प्रत्येक जिल्ह्यात जनजागृती होणे गरजेचे आहे. तेव्हा तरुणाई नशेच्या आहारी न जाता ग्रंथालयात गेले पाहिजेत. चांगल्या लेखकांच्या पुस्तकांचे वाचन करायला हवे. दररोज वर्तमानपत्रे वाचल्याने आपल्या परिसरातील घडामोडी समजून चांगल्या मार्गाचा अवलंब करू शकतो. म्हणजे नकळत असा बदल घडत असतो. हे भविष्याच्या दृष्टीने चांगले आहे. तेव्हा देशात विकासाच्या दृष्टिकोनातून नशामुक्ती भारत अभियान देशातील प्रत्येक जिल्ह्यात राबविणे गरजेचे आहे.

# रामायणाचार्य ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांचे रमाकांत (बापू) मुंडे परिवाराने घेतले आशिर्वाद

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहरापासुन जवळच असलेल्या बीड रोड वरील ह.भ.प.केशव महाराज शास्त्री यांनी आयोजित केलेल्या भगवान श्रीकृष्ण मंदिराच्या भव्य भूमिपूजन सोहळ्या निमित्त १०८ कुंडी भव्य महाविष्णु याग,यज्ञ कार्यक्रम दि.११ मार्च बुधवार पासुन सुरु झाला असन गुरुवार दि.१२ मार्च पासुन ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून संगीत रामकथा सुरु झाली असुन यावेळी उपस्थित झालेले ह.भ.प.

रामराव ढोक महाराज यांचे स्वागत भाजपाच्या महीला अध्यक्षा तथा माजी जि.प.सदस्या सौ. उषाताई मुंडे व भाजपाचे जेष्ठ नेते रमाकांत बापू व मुंडे परिवाराने पुष्पहार घालून ढोक महाराज यांचे आशिर्वाद घेतले.

केज शहरा पासुन जवळच असलेल्या भगवान श्रीकृष्ण आश्रम बीड रोड येथे श्रीकृष्ण मंदिराच्या भव्य भूमिपूजन सोहळ्या निमित्त १०८ कुंडी भव्य महाविष्णु याग,यज्ञ कार्यक्रम दि.११ मार्च बुधवार पासुन सुरु झाला असून गुरुवार दि.१२ मार्च पासुन ह.भ.प. रामराव ढोक महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून संगीत रामकथा दररोज दुपारी २ते ५ यावेळेत ही कथा सुरु आहे.याकथेला नागरीक वमहिलांची मोठी गर्दी होत आहे. अनादि कालापासून ऋषि-मुनि जगत्कल्याणा साठी त्यांचे यज्ञाद्वारे पूजन करत आले आहेत विष्णु यज्ञेन सर्वत्र सिध्दिर्भवति आपल्या धर्मग्रंथांमध्ये सांगितल्या प्रमाणे श्री विष्णु यज्ञाने सर्व सिद्धी अर्थात इच्छापूर्ती विवाह-शुभ फल प्राप्ती,वंशवृद्धी, पितृदोष निवृत्ती तथा दारिद्र्यनाश होऊन महालक्ष्मीची कृपा प्राप्त होते.तसेच तन,मन शुद्धी, संकल्पसिद्धी, अध्यात्मीक उन्नती होते. सकल मनोकामना पूर्णकरणारा 'महाविष्णु याग' भगवान श्रीकृष्ण आश्रम या ठीकाणच्या या महा यज्ञामधे अनेक परिवार सहभागी होऊन जीवनातील काम,क्रोध, लोभ,मोह,मत्सर इत्यादी दुर्गुणांची व व्यसनांची आहुती या यज्ञामध्ये देऊन सुख,शांती व समाधान प्राप्त व्हावे यासाठी या यज्ञ सोहळ्यात दि.१२ मार्च रोजी सौ.उषाताई रमाकांत मुंडे,सौ. पुनमताई मधुर मुंडे, मुलगी ईरा दिदी यांनी सहभागी होऊन ही पुजा करुन सदैव सुखी व आनंदी राहण्याची इच्छा व्यक्त करुन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध रामायणाचार्य,श्री.ह.भ.पपरमपूज्य रामराव महाराज ढोक यांचे स्वागत रमाकांत बापू, उषाताई,ईरा दिदी, पुनमताई,मधुरभैय्या मुंडे यांनी पुष्पहार घालून स्वागत करुन ढोक महाराज यांचा आशिर्वाद घेतला.तसेच दररोज रामकथा व किर्तनाचे नियमितपणे श्रवण करण्याचा निर्णय घेतला आहे.



# गुरव समाजाचा मुंबईत एल्गार! १७ मार्चला आझाद मैदानावर धडकणार न्यायाचा विराट मोर्चा


दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

राज्यातील गुरव समाजाच्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या आणि न्याय्य मागण्यांसाठी आता निर्णायक आरपारची लढाई सुरू झाली आहे. अखिल गुरव समाज संघटनेच्या वतीने येत्या १७ मार्च रोजी मुंबईतील आझाद मैदानावर भव्य धरणे आंदोलन आणि विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. आता नाही तर कधीच नाही या भूमिकेतून राज्याच्या कानाकोपऱ्यातून समाजबांधव मोठ्या संख्येने मुंबईत धडकणार असल्याची माहिती संघटनेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष शीतल शिंदे यांनी दिली आहे.गुरव समाजावर ऐतिहासिकदृष्ट्या झालेल्या अन्यायाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन छेडले जात आहे. आंदोलनाचे मुख्य केंद्रबिंदू खालीलप्रमाणे आहेत:

> **हा लढा आपल्या अस्तित्वाचा आणि हक्काचा आहे. १७ मार्चच्या ऐतिहासिक आंदोलनात प्रत्येक समाजबांधवाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला आवाज शासनापर्यंत पोहोचवावा आणि शक्तीप्रदर्शन करावे.**
>
> **सतीश कुवर,दाहीगाव**
> **गुरव समाज संस्था अध्यक्ष नंदुरबार.**

देवस्थान इनाम वर्ग-३ जमिनींच्या प्रश्नावर तातडीने मार्ग काढून वतन खालसा प्रक्रियेतील अन्याय दूर करणे.बेकायदेशीर जमिनींचे हस्तांतरण रद्द करून मूळ सनदधारकांना न्याय मिळवून देणे.मंदिर ट्रस्टमध्ये गुरव समाजाला किमान ५० टक्के सन्मानपूर्वक प्रतिनिधित्व मिळावे. पुजाऱ्यांचा वंशपरंपरागत पूजा हक्क अबाधित राखणे आणि ६० वर्षांवरील पुजाऱ्यांना मासिक मानधन योजना लागू करणे. १९५० च्या सार्वजनिक विश्वस्त कायद्यातील त्रुटी दूर करणे आणि ओबीसी आरक्षणातील अन्यायावर कायदेशीर उपाययोजना करणे.

आंदोलनाची रणनीती ठरवण्यासाठी जेजुरी येथे समाज पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत आंदोलनाचे सुसूत्र नियोजन करण्यात आले असून, राज्यभरातील लोकप्रतिनिधी आणि समाजबांधवांनी मुंबईत एकजुटीचे दर्शन घडवण्याचा निर्धार केला आहे. या लढ्याला विविध सामाजिक संघटनांनीही आपला जाहीर पाठिंबा दर्शविला आहे.शासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने पाहून सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र होण्याचे संकेत मिळत आहेत.



# शेलघर येथे 'यमुना स्त्री सन्मान' पुरस्काराचे झोकात वितरण

## महिलांच्या स्वावलंबनासाठी मी कटिबद्ध-सुजाता पाटील

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महिलांना रोजगार मिळावा, यासाठी मी नवी मुंबई परिवहन सेवेत प्राधान्य देणार आहे. महिला स्वावलंबी होणे गरजेचे आहे. त्यासाठी मी कटिबद्ध आहे. यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेचे कार्य चांगले आहे. गरिबांचा विचार करून सुरू असलेले संस्थेचे शैक्षणिक कार्य महत्त्वाचे आहे. विविध क्षेत्रांतील महिलांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या पाठीवर पुरस्काराच्या रूपाने मारलेली थाप कौतुकास्पद आहे, असे नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील म्हणाल्या. राजकारणात त्यांनी गृहिणी, नगरसेवक, समाजकल्याण सभापती ते महापौर अशी घवघवीत कामगिरी केली आहे. तसेच त्या उच्चशिक्षित आहेत. त्याबद्दल त्यांना यमुना स्त्री सन्मान पुरस्कार देण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.




यावेळी कला, क्रीडा, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, वैद्यकीय अशा समाजाशी निगडित क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महिलांनाही यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेतर्फे यमुना स्त्री सन्मान पुरस्कार दिला गेला. हा समारंभ बुधवारी (ता. ११ मार्च) उलवे नोड येथे शेलघर येथील 'सुखकर्ता' बंगल्याच्या गार्डनवर दिमाखात पार पडला. आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या मातोश्री दिवंगत यमुनाबाई तुकाराम घरत यांच्या नावाने हा पुरस्कार दिला गेला. त्यात नवी मुंबईच्या नवनिर्वाचित महापौर सुजाता पाटील, पनवेलच्या उपमहापौर प्रमिला पाटील, उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक वैशाली गलांडे, माया जाधव (लावणी सम्राज्ञी), मीनल भामरे (तहसीलदार, पनवेल), अड. श्रद्धा ठाकूर (वकील), अपर्णा पवार (वैद्यकीय अधिकारी), सुप्रिया घरत (संगीत विशारद), रिदिमा म्हात्रे (बॅडमिंटनपटू), जान्हवी सावंत यांचा समावेश होता. या सर्व महिलांचा स्मृतिचिन्ह, पैठणी आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी माजी खासदार रामशेठ ठाकूर म्हणाले, महेंद्रशेठ घरत आई-वडिलांचा आणि माझाही वारसा चालवत आहे. आमच्या संबंधात राजकारण आडवे येत नाही. तो सतत धडपडत असून आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याने नाव कमावले आहे, हे अभिमानास्पद आहे. यावेळी ज्येष्ठ लावणी सम्राज्ञी माया जाधव म्हणाल्या, पहिल्यांदा मी शिक्षण घेतले, त्यानंतरच नृत्याकडे वळली. लावणीच्या कार्यक्रमांना महिला येत नव्हत्या, तेव्हा मी खास महिलांसाठी प्रयोग केले, ते हाऊसफुल्ल झाले. यावेळी महाराष्ट्र प्रदेशचे युवा अध्यक्ष शिवराज मोरे, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, मुंबई मराठी पत्रकार संघाच्या उपाध्यक्षा स्वाती घोसाळकर, तसेच सिनेअभिनेत्री सायली संजीव उपस्थित होत्या. संस्थेच्या सचिव शुभांगीताई घरत यांच्या हस्ते मान्यवर महिलांचे स्वागत करण्यात आले. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, माझे आई-वडील कष्टाळू होते. आईने गरिबीशी सामना करताना आम्हा भावंडांना शिकविले, मोठे केले. आई-वडिलांची नाळ समाजाशी जोडलेली होती. सामाजिक बांधिलकी त्यांनी कायम जपली. त्यामुळे त्यांचा वारसा जपण्यासाठीच मी समाजसेवेचे व्रत हाती घेतले. त्याचाच भाग म्हणून आई-वडिलांच्या नावाने शैक्षणिक काम सुरू केले. यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेद्वारे गरिबांच्या मुलांना अत्यल्प फीद्वारे इंग्रजी माध्यमातून शिक्षण दिले जात आहे, तर वडिलांच्या नावाने ज्युनियर महाविद्यालय सुरू आहे. आईच्या निधनानंतर यमुना स्त्री सन्मान पुरस्कार समाजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना देण्याचा निर्णय घेतला. जेणेकरून समाजातील लढणाऱ्या महिलांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप मिळेल. अन्नदान आणि गरजूंना मदत हेच कार्य पुढील काळातही सुरू राहील. यावेळी उद्योजक सोनाली घरत, कुणाल घरत, जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीष पाटील, ॲड. अविनाश ठाकूर, राम म्हात्रे, ढाणे सर आदी मान्यवर उपस्थित होते.

# ठाणे जिल्ह्यात 'उमेद' अभियानाचा सक्षमीकरणाचा प्रवास

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे. स्वयंसहाय्यता समूहातील महिलांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय व मिनी सरस विक्री प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे रणजित यादव यांच्या हस्ते दि. १० मार्च, २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण मैदान (मॅक्सी ग्राऊंड), कर्णिक रोड, कल्याण, जिल्हा-ठाणे येथे संपन्न झाले.यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी सांगितले की, जिल्ह्यातील ग्रामीण भागातून सुमारे २०० महिला या प्रदर्शनात सहभागी झाल्या असून १०० स्टॉल्सवर विविध हस्तकला वस्तू, घरगुती उत्पादने व खाद्यपदार्थ विक्रीसाठी उपलब्ध आहेत. महिलांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध व्हावी व त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हा प्रशासनाच्या सहकार्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना मोठी बाजारपेठ उपलब्ध होत असून बचत गटातील महिला जागतिक दर्जाचे उत्पादन तयार करण्यासाठी पुढाकार घेत आहेत, असे त्यांनी सांगितले. महिलांच्या कल्पकतेला आणि उमेदीला मर्यादा नसून त्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडविणे हेच या उपक्रमाचे मुख्य ध्येय असल्याचे त्यांनी नमूद केले.तसेच यादव पुढे म्हणाले की, उमेद अभियान ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवून त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी कटिबद्ध आहे. महिलांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि 'लखपती दीदी' योजनेद्वारे त्यांचे उत्पन्न वाढवणे हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ठाणे जिल्ह्यातील अधिकाधिक महिला 'लखपती दीदी' होण्यासाठी जिल्हा प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे. महिलांचे सक्षमीकरण, व्यवसाय विकास, उत्पादनांची गुणवत्ता, ब्रँडिंग, उत्पन्न वाढ आणि सक्रिय सहभाग यामुळे हे उद्दिष्ट साध्य होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनास भेट देऊन महिलांना प्रोत्साहन द्यावे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या नावे विद्यापीठ तुकडोजी विचारधारा अभ्यासक्रम मान्यतेवीना ?

**दैनिक वादळ वार्ता**
**नागपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नामविस्ताराने नागपूर विद्यापीठ जेव्हा नावारूपास आले. तेव्हा या विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी विचारधारा अभ्यासक्रम असावा असा प्रयत्न मी (ज्ञानेश्वर रक्षक) सातत्याने लावून धरला. नामविसस्ताराआधी गीताचार्य तुकारामदादा यांच्या मार्गदर्शनात तत्कालीन कुलगुरू अरूण सातपुळे यांचेकडे आम्ही अभ्यासक्रमाची मागणी केली होती. कारण युज़ीसीचे तत्कालीन चेअरमन अरूण निगवेककर यांनी तुकारामदादा यांना अश्वसीत केले होते. राष्ट्रसंत तुकडोजी विचारधारेला युजीसी याच्या मान्यतेसाठी.




पण नामविस्ताराआधी याच विद्यापीठातील तत्कालीन विचारवंत राष्ट्रसंतांना साहित्तीकच मानायला तयार नव्हते. ग्रामगीता एम. ए. मराठी अभ्यासक्रमातून काढली होती. त्या वीरोधात तेव्हा आम्ही आंदोलन करून तत्कालीन कुलगुरू आणि कुलसचिव यांना प्रतीकात्मक काळे फासत रष व्यक्त केला होता. ग्रामगीता पूर्ववत अभ्यासक्रमात लागली.

नामविस्तारा नंतर राष्ट्रसंत तुकडोजी अध्यासन, ग्रामगीता भवन, राष्ट्रसंतांचा लिहता पुतळा आणि विद्यापीठ गीत या भारतात बंधु भाव नित्य वसू दे राष्ट्रसंत लिखीत डॉ. एस. एन. पठाण कुलगुरू असताना त्यांच्या प्रयत्नातून झाले.

त्यानंतर डॉ. विलास सपकाळ कुलगुरू असतांना आम्ही एम. ए. राष्ट्रसंत तुकडोजी विचारधारा सुरू करा यासाठी मागणी लावून धरली. सपकाळ यांनी त्याला मान्यता दिली. डॉ. सुभाष सावरकर, ज्ञानेश्वर रक्षक यांच्या अथक प्रयत्न आणि दुरदृष्टीने अभ्यासक्रम २०१३ मध्ये पूर्ण झाला. सपकाळ सरांनी सीलॅबसला मान्यता देत अभ्यासक्रम सुरू करायला मान्यता दिली. पण विद्यापीठातील शुक्राचार्यांनी अभ्यासक्रम सुरू होऊ नये. राष्ट्रसंतां साहित्य त्या लायकीचे नाही असे दबक्या आवाजात बोलणे सुरू केले. एक विद्वान मला सर्टीफीकेट कोर्सची मागणी करा असा सल्ला देत होते. आता तेच श्रेय लाटण्याचा प्रयत्न करतात. श्रीगुरूदेव युवामंच द्वारा आम्ही अभ्यासक्रम मागणी लावून धरली. २०१५ मध्ये आमच्या भावना तत्कालीन कुलगुरू डॉ. सिध्दार्थविनायक काणे यांना पटल्या, पण शुक्राचार्यांचा प्रचार असायचा विद्यार्थी प्रवेश घेत नाही. पण त्यांना मात्र अभ्यासक्रमाला प्रवेश शुल्क किती घ्यायचे हे माहित नव्हते.

२०१५ पहिल्याच प्रवेशात २८ विद्यार्थी सहभागी झाले. राष्ट्रसंतांच्या साहित्यावर हेच विद्यार्थी प्रबंध लिहायची मागणी करायला लागले, तेव्हा आम्हाला कळल, तुकडोजी विचारधारा अभ्यासक्रमाला युजीसी मान्यता नसल्यामुळे हा विभाग वांझोटा आहे.

नुकतेच राष्ट्रसंत तुकडोजी विचारधारा द्वारा राष्ट्रसंत तुकडोजी विचार साहित्य संमेलन घेतले. उद्घाटक होते नागपूरचे खासदार केंद्रीय मंत्री नितीनजी गड़करी आणि कुलगुरू क्षीरसागर मॅडम ह्यांना ज्ञानेश्वर रक्षकांनी व्यथा सांगीतली. युजीसी मान्यतेसाठी फाईल तयार करा मी प्रयत्न करतो असे ठणकावूनच नितीनजी गडकरी बोललेत. त्यांच्या आश्वासनाला यश येवो हिच प्रार्थना !

असे आव्हान ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक
सदस्य राष्ट्रसंत तुकडोजी साहित्य मंडळ
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर

## क्युरिऑसिटी प्रायमरी स्कूल व उज्वल अकॅडमीचे वार्षिक स्नेहसंमेलन 'विश्वरंग २०२६ उत्साहात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । यज्ञकांत कोल्हे**

जय भवानी नगर,सांगवी (बु.) येथील क्युरिऑसिटी प्रायमरी स्कूल व उज्वल अकॅडमी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले वार्षिक स्नेहसंमेलन 'विश्वरंग २०२६' मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाले. रविवार दि.८ मार्च २०२६ रोजी शाळेच्या प्रांगणात हा रंगारंग कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ.संध्याताई बालाजी कल्याणकर (अध्यक्ष शिवालय प्रतिष्ठान,शिवालय महिला उद्योग समूह व शिवालय अर्बन निधी लि.नांदेड) या होत्या,तर प्रमुख पाहुणे म्हणून सिद्धार्थ खिल्लारे (झी टीव्ही हास्य सम्राट) यांची उपस्थिती लाभली होती.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले.




या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. देशभक्तीपर गीत,पारंपरिक नृत्य, समूह नृत्य,नाटिका तसेच सामाजिक संदेश देणारे देखावे यामुळे प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने सादर केलेल्या कलागुणांना उपस्थित पालक व नागरिकांनी भरभरून दाद दिली.यावेळी प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षणासोबतच कला,क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे संचालक मा.प्रा.श्री.माधव खिल्लारे व प्राचार्या मा.सौ.आशा माधव खिल्लारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन व सादरीकरण शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी केले.नृत्य सादरीकरणासाठी बाळासाहेब आठवले बारडकर यांनी कोरिओग्राफी केली.या कार्यक्रमास पालक,नागरिक व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.रंगारंग सादरीकरणामुळे 'विश्वरंग २०२६' स्नेहसंमेलन संस्मरणीय ठरले.

## आर्या नैसर्गिक शेतीला समाजकार्य महा-विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची अभ्यासपूर्ण भेट

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । गोविंद मोरे**

दापशेड ता.लोहा जि. नांदेड येथील विश्वनाथ पाटील होळगे यांच्या आर्या नैसर्गिक शेतीला आज गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय, पुसद (ता. पुसद, जि. यवतमाळ) येथील चडथ प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण भेट दिली. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना नैसर्गिक शेतीची संकल्पना, तिचे फायदे आणि महत्त्व प्रत्यक्ष अनुभवातून समजून घेणे हा होता.




या प्रसंगी विश्वनाथ होळगे यांनी नैसर्गिक शेती सुरू करताना घेतलेली मेहनत, आलेल्या अडचणी आणि त्या अडचणींवर मात करून मिळवलेले यश याबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांनी यासाठी विशेष प्रश्नावली तयार करून नैसर्गिक शेतीची पद्धत, त्यामागील तत्त्वज्ञान, खर्चात होणारी बचत, उत्पादनातील बदल तसेच पर्यावरणपूरक नैसर्गिक शेतीचे फायदे याबाबत माहिती जाणून घेतली. प्रत्येक पिकाची लागवड पद्धत, त्याची देखभाल व नैसर्गिक शेतीमधील त्याचे महत्त्व याबाबत त्यांनी सविस्तर माहिती देत विद्यार्थ्यांना या शेतीचे महत्त्व पटवून दिले.

तसेच विश्वनाथ होळगे व त्यांच्या पत्नी यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला, त्यामुळे विद्यार्थ्यांना हा अनुभव अधिक प्रेरणादायी ठरला.


विश्वनाथ होळगे यांनी नैसर्गिक शेतीची गरज,महत्त्व, रासायनिक शेतीमुळे होणारे दुष्परिणाम , या विषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने सर्व माहिती जाणून घेतली. याप्रसंगी उपस्थित अनुलोम संस्थेचे गंगाधर मैलारे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मारुती मोरे, स्वामी विवेकानंद कोचिंग क्लासेसचे संचालक किशन टोनगे तसेच तेजस मोरे उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत नैसर्गिक शेतीबाबत जागरूकता वाढवण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

ही भेट विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली असून, नैसर्गिक शेतीकडे समाजाचा कल वाढविण्यासाठी अशा उपक्रमांचे मोठे महत्त्व आहे, असे मत भारत सरकार मास्टर ट्रेनर, राष्ट्रपती सन्मानित, आर्या नैसर्गिक शेतीचे प्रणेते विश्वनाथ पाटील होळगे यांनी या वेळी व्यक्त केले.

## धर्मवीर छावा संघटनेच्या उमरेड तालुका प्रमुख पदी अनंतकुमार बावणे यांची नियुक्ती

**दैनिक वादळ वार्ता**
**उमरेड । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले अनंतकुमार बावणे यांच्या कार्याची दखल घेत त्यांची धर्मवीर छावा उमरेड तालुका प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली.आहे संस्थापक अध्यक्ष गणेश उगले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वअनिकेत उमरेडकर विदर्भ प्रमुख यांच्या व ज्योती ताई यादव विदर्भ प्रमुख महिला आघाडी यांच्या सुधा मार्गदशनात ही उमरेड तालुका प्रमुख नियुक्ती केली आहे. उमरेड मधील गोरगरीब कष्टकरी शेतकरी कामगार जनतेला न्याय मिळावा याकरिता धर्मवीर छावा संघटना काम करणार असून उमरेड तालुका मध्ये लवकरच




संघटनेची बांधणी करण्यात येईल या अनुषंगाने महिलांवर होणाऱ्या अत्याचार शेतकऱ्यांवर होणाऱ्या अत्याचार गोरगरीब, अश्या जनतेला न्याय मिळवा या साठी उमरेड तालुका प्रमुख या पदी निवड करण्यात आली

## तेलकामठी येथील महावितरणचे कार्यालय रामभरोसे लहरी व मर्जीप्रमाणे चालतो कारभार

**दैनिक वादळ वार्ता**
**तेलकामठी । प्रतिनिधी**

कळमेश्वर तालुका अंतर्गत येणाऱ्या तेल कामठी येथील महावितरण कार्यालय उघडण्याची वेळ निश्चित नसल्यामुळे या कार्यालयाच्या कारभार लहरी व मर्जीनुसार चालत असल्याने स्थानिक नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.कार्यालयात कार्यरत कर्मचारी हेडकॉटरला राहात नसतात किंवा कोणीही स्थायिक कर्मचारी येथे वास्तव्य करीत नसल्याने कार्यालय नेहमी १२ नंतर उघडतात तसेच दुपारी ४ चे दरम्यान नेहमी बंद होत असल्याने कार्यालय केव्हा उघडेल यासाठी ग्रामस्थांना सारख्या कार्यालयाकडे हेलपाट्या घालाव्या लागतात याचा ग्राहकांना सारखा त्रास होत असतो. एखाद्या प्रसंगी पावसाने वादळाने रात्रीच्या वेळेस विद्युत प्रवाह खंडित झाल्यास कोणीही जबाबदार कर्मचारी राहत नसल्याने गावकऱ्यांना रात्रभर विजेच्या प्रतीक्षेत तात्काळत राहावे लागते. तर शेतकऱ्यांना या समस्येचा सर्वात जास्त फटका बसत असून कार्यालयात तक्रार घेऊन गेल्यास ऑफिसची ठराविक वेळ नसल्याने भरतीच्या पावलाने घरी वापस यावे लागते, कार्यालयातील कार्यरत कर्मचाऱ्यावर अधिकाऱ्याचा वचक नसल्याने कर्मचारी मगरूर भाषेत बोलत असल्याने गावकऱ्यांनी विद्युत विभागावर तीव्र नाराजीचा सूर व्यक्त केला आहे. उपरोक्त समस्या मार्गी लागण्यासाठी संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक लक्ष देऊन ही समस्या मार्गी लावावी अन्यथा ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. व वीज बिल विज बिल भरण्यास लेट झाले तर त्या ग्राहकांच्या घरी जाऊन ग्राहकांचा काही ऐक्त नसून जबरदस्तीने लाईन काढण्यात येतात ग्राहक एक दिवसाचा वेळ मागतात तरी ते ऐक्त नसल्यामुळे जबरदस्तीने लाईन काढतात व जवळील संबंधातील लोकांना वेळ दिला जातो असे का व या हेडकॉटरवर गंधगी वाढलेले गवत काडीकचरा खूप आहे यावर ते दुर्लक्ष करतात टोटल आठ कर्मचारी आहे.



## सिंदेवाही अन्नपुरवठा विभागच्या रेशनिंग धान्याचा 'काळाबाजार

# सामान्य नागरिक त्रस्त अन्नपुरवठा विभाग मस्त संबंधित वरिष्ठ अधिकारी सुस्त

**दैनिक वादळ वार्ता**

सरकारने एका बाजूला शासनाकडून अतिगरीब व गरजू कुटुंबांच्या पोटाची खळगी भरण्यासाठी मोफत शिधापत्रिका धारक योजनेचा गाजावाजा केला जात आहे, तर दुसरीकडे सिंदेवाही तालुक्यात अन्नपुरवठा विभागामार्फत शिधापत्रिका धान्याची सर्रासपणे 'काळाबाजारी' होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. गावोगावी फिरणारे दलाल गरिबांकडून स्वस्त धान्य विकत घेऊन ते चढ्या दराने खुल्या बाजारात विकत आहेत, मात्र यावर संबंधित विभागाचे मौन अनेक प्रश्न निर्माण करत आहे.

१-काय आहे अन्नपुरवठा विभाग निद्रेत असल्याने धान्याचा हा 'काळा बाजार

मिळालेल्या माहितीनुसार, अंत्योदय आणि प्राधान्य गट कार्डधारकांकडून दलाल प्रति किलो गहू २० रुपये आणि तांदूळ २२ रुपये या दराने खरेदी करत आहेत. शासनाने गरिबांना 'मोफत' दिलेले धान्य दलालांकडून पुन्हा विकत घेतले जात आहे, जेणेकरून ते धान्य प्रक्रिया करून खुल्या बाजारात मोठ्या नफ्याने विकले जाते. अपात्र लाभार्थ्यांचा समावेश आणि खऱ्या गरजूंची वंचना अतिगरीब कुटुंबांसाठी असलेल्या अंत्योदय (AAY) योजनेत अनेक श्रीमंत आणि अपात्र असलेले लोक घुसल्याची चर्चा आहे.परिणामी ज्यांच्या घरात धान्याचा साठा आहे, असे लोक हे धान्य दलालांना विकत आहेत. तर, खरोखर दोन वेळच्या भाकरीसाठी संघर्ष करणारे गरजू लाभार्थी रेशन कार्डाच्या अंत्योदय यादीतून वगळल्यामुळे धान्य मिळवण्यापासून वंचित झाल्याची चर्चा आहे.

शासन निर्णय आणि कार्यवाहीची तरतूद :-रेशनिंगचा गैरवापर रोखण्यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा (NFSA) २०१३ अंतर्गत कडक तरतुदी आहेत.कलम ७ व ८: रेशनिंग मालाची विक्री करणे हा फौजदारी गुन्हा आहे.महाराष्ट्र सार्वजनिक वितरण व्यवस्था (नियंत्रण) आदेश २०१५: यानुसार रास्त भाव दुकानदारांवर आणि धान्य चोरणाऱ्या दलालांवर अत्यावश्यक वस्तू कायद्यांतर्गत (Essential Commodities -ct) कारवाई होणे अपेक्षित आहे.दंडात्मक कार्यवाही चुकीच्या पद्धतीने धान्य विक्री केल्यास परवाना रद्द करणे, मालाचा जप्ती आणि कारावासाची शिक्षा होऊ शकते. शासन आणि प्रशासनाची जबाबदारी व कर्तव्य



प्रशासनाचे काम केवळ धान्य वाटप करणे नसून ते गरजूंपर्यंत पोहोचते की नाही, हे पाहणे आहे.तपासणी-तहसीलदार आणि पुरवठा निरीक्षकांनी रास्त भाव दुकानांची नियमित तपासणी करणे बंधनकारक आहे.लाभार्थी पडताळणी- 'ई-केवायसी' (e-KYC) च्या माध्यमातून अपात्र लाभार्थ्यांना त्वरित यादीतून काढून टाकावे.

दलालांवर वचक- गावोगावी फिरणाऱ्या संशयास्पद खरेदीदारांवर गुन्हा दाखल करणे ही प्रशासनाची नैतिक जबाबदारी आहे.या गैरव्यवहाराचे सामान्य नागरिकांवर दुष्परिणाम

आर्थिक नुकसान: गोरगरीब कुटुंबांच्या मुखातून शासनाचे धान्य हिरावून घेतल्यामुळे गरिबीचे चक्र अधिक खोलवर जात आहे.उपोषणाची वेळ- गरजू कुटुंबांना वेळेवर रेशन मिळत नसल्याने कुपोषणाचा धोका वाढतो.अविश्वासाचे वातावरण-सरकारी यंत्रणेवरचा लोकांचा विश्वास उडत आहे. निष्कर्ष-दलालांचा काळ्या बाजाराशी संबंध-सिंदेवाहीतील हे दलाल केवळ किरकोळ व्यापारी नसून, त्यांचा रेशनिंगच्या मोठ्या को[illegible]ाजाराशी साखळी (Chain) पद्धतीने संबंध असल्याचे प्राथमिक चर्चेवरून दिसून येते. प्रशासनाचे मौन हे प्रशासनाच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह चर्चेतून उपस्थितीत केला जात आहे जर आताच ठोस कार्यवाही झाली नाही, तर शासनाची ही महत्त्वाकांक्षी योजना केवळ कागदावरच मर्यादित राहील.

प्रशासनाला प्रश्न-तालुक्यात रेशनिंग धान्य खरेदी करणाऱ्या दलालांवर आजवर किती गुन्हे दाखल झाले ?अंत्योदय यादीची पुनर्पडताळणी (Social-udit) का केली जात नाही?गरिबांच्या हक्काची ही चोरी थांबवण्यासाठी तहसीलदार आणि पुरवठा विभाग कारवाई कधी करणार?सिंदेवाही तालुक्यात अन्नपुरवठा विभागाचा काळाबाजार असून गरजू लाभार्थ्यांना मिळणारा योजनेचा माल अपात्र लाभार्थी उचलून तो दलालाना विकतात ही शोकांतिका असून लवकरच प्रशासनाने यावर ठोस पाऊल उचलून दलालावर कार्यवाही करावी-वहाबभाई सय्यद जेष्ट कार्यकर्ता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी(अजितदादा पवार गट) तालुका सिंदेवाही जिल्हा चंद्रपूर

# रोषमाळ मंडळात 'महाराजस्व समाधान शिबिर' उत्साहात १२६८ लाभार्थ्यांना एकाच छताखाली विविध योजनांचा लाभ

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

शासकीय योजनांचा लाभ थेट जनतेच्या दारापर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' (टप्पा-१) चे आयोजन ७ मार्च रोजी धडगाव तालुक्यातील रोषमाळ मंडळात करण्यात आले होते. तहसीलदार मनोजकुमार ऐतवडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या शिबिरात विविध विभागांच्या तब्बल १२६८ लाभार्थ्यांना शासकीय योजनांचे लाभ व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. स्वागत आणि प्रास्ताविक मंडळ अधिकारी आशा देवांग यांनी केले. यावेळी त्यांनी या अभियानाचा मुख्य उद्देश नागरिकांच्या अडीअडचणी सोडवून त्यांना शासकीय सेवा विनाविलंब उपलब्ध करून देणे हा असल्याचे सांगितले.



याप्रसंगी गट विकास अधिकारी मनोज भोसले यांनी पंचायत समिती, महिला व बालविकास विभागाच्या योजनांची माहिती दिली. तालुका कृषी अधिकारी आर. एम. शिंदे यांनी कृषी विभागाच्या विविध अनुदाने व योजनांवर प्रकाश टाकला. अध्यक्षीय भाषणात तहसीलदार मनोजकुमार ऐतवडे यांनी महसूल विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या 'एक खिडकी' योजनेचे महत्त्व पटवून दिले.

शिबिरात महसूल, कृषी, पंचायत समिती, पुरवठा आणि आरोग्य विभागाचे स्टॉल्स लावण्यात आले होते. यामध्ये खालीलप्रमाणे लाभ देण्यात आले:

* महसूल व पुरवठा विभाग: ३१ नवीन रेशन कार्ड, ५५ युनिट कमी करणे, १२ युनिट वाढवणे, १५ उत्पन्न दाखले, १८ डोमासाईल आणि ८ जातीच्या दाखल्यांचे वाटप करण्यात आले. तसेच १८ डिजिटल ७/१२ आणि १३ '८-अ' उतारे देण्यात आले.
* पंचायत समिती: सर्वाधिक १७२ विवाह दाखले, १४० जन्म दाखले, १७० मृत्यू दाखले आणि ८४ जॉब कार्डचे वाटप करण्यात आले.
* कृषी व विकास योजना: ३१ सिंचन विहीर मंजूर आदेश, ४ ट्रॅक्टर (कृषी यांत्रिकीकरण), २ शेततळे आणि ७ गोठ्यांचे मंजुरी आदेश देण्यात आले.
* सामाजिक अर्थसहाय्य: संजय गांधी निराधार योजनेचे २३ आणि श्रावणबाळ योजनेचे १४ मंजुरी आदेश देण्यात आले.
* आरोग्य विभाग: ५० नागरिकांची प्राथमिक आरोग्य तपासणी करण्यात आली, तर १६ सिकलसेल अर्ज प्राप्त झाले.

**महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

शिबिरास महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून तहसीलदार ऐतवडे यांनी उपस्थित महिलांना शुभेच्छा दिल्या. तसेच 'लेक लाडकी' आणि 'प्रधानमंत्री मातृ वंदना' योजनेच्या लाभार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

**पुढील शिबिर १४ मार्चला**

रोषमाळ येथील शिबिराच्या यशानंतर, पुढील महाराजस्व समाधान शिबिर १४ मार्च २०२६ रोजी खुंटामोडी मंडळातील कात्री येथे आयोजित करण्यात आले आहे. परिसरातील नागरिकांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला निवासी नायब तहसीलदार किसन गावीत, नायब तहसीलदार अजबसिंग वळवी, सहाय्यक गट विकास अधिकारी संगीता नाईक सर्व ग्राम महसूल अधिकारी,कृषी सहाय्यक आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते

# सातपुड्यात बहरतेय भोकर (हेल्टो) रानभाजी

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

सातपुड्याच्या दऱ्या खोऱ्यात फेब्रुवारी महिन्याच्या उत्तरार्धात व मार्च महिन्यात येणारी भोकर (हेल्टो) ही औषधी गुणधर्म असलेली रानभाजी भर उन्हाळ्यात आदिवासी बांधवांसाठी वरदान ठरत असून सध्या तिचा बहर तेजीत आलेला दिसून येत आहे.

भोकर (आदिवासी बोली भाषेत तिला हेल्टो म्हणतात ) ही सातपुड्यात आढळणारी दुर्मिळ व अत्यंत गुणकारी असलेली रानभाजी असुन विशेषत: महिलांसाठी ती महत्त्वाची भाजी ठरत आहे.भोकर (हेल्टो) ही अत्यंत गुणकारी वनस्पतीचे झाड असुन त्याची पाने, फळे, आणि साल औषधी गुणधर्म युक्त असे आहे. उन्हाळ्यातील फेब्रुवारी महिन्याच्या उत्तरार्धात मार्च व एप्रिल महिन्यात भोकरच्या झाडाला हिरवी पाने व मोहर येतो आदिवासी बांधव त्याला भाजी म्हणुन उपयोग



करतात. या भोकरची भाजी प्रामुख्याने दुधात व तेलामध्ये बनवली जाते ही चवीला अतिशय चविष्ट व गुणकारी रानभाजी म्हणून प्रसिद्ध आहे. सातपुड्यातील अनेक ठिकाणी खेड्या पाड्यांवर मोहराने बहरलेली भोकरची झाडे मोठ्या प्रमाणावर दिसून येतात.भोकरची भाजी ही उन्हाळ्यात खवय्यांसाठी खुप आरोग्यवर्धक ठरते. ही भाजी उष्णतेमुळे होणारे पित्त कमी करण्यास, सांधेदुखीमध्ये आराम देण्यास, आणि जखमा लवकर भरुन काढण्यास मदत करते. आणि ती रानभाजी असल्याने रोग प्रतिकारक शक्ती वाढवण्यास ही उपयुक्त असल्याचे सांगितले जाते. बाजारात ही भाजी जवळपास दीडशे ते दोनशे रुपये किलो अशा भावाने पण दुर्मिळ स्वरुपात मिळते.

# श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशन व श्री संस्कार इंग्लिश स्कूल च्यावतीने जागतिक महिला दिन उत्साहत साजरा

## परिसरातील कृतत्वान महीलांचा सन्मान संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील ग्रामीण भागात अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या श्री संस्कार इंग्लिश स्कूल व श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशन च्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

याविषयी सविस्तर वृत्त असे कि ग्रामीण भागातील कृतत्वान महिलांचा आदर सत्कार व्हावा या सामाजिक बांधीलकिने श्री संस्कार एज्युकेशन ग्रुप च्या वतीने परिसरातील कृतत्वान महिलांचा सन्मान चिन्ह देऊन विषेश सन्मान करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने या कार्यक्रमाच्या अध्यक्षा चिंचोली माळी च्या कर्तव्य दक्ष सरपंच सौ. रोहिणीताई सुनिल देशमुख, प्रमुखपाहुण्या केज पंचायत समितीच्या प्रशासकीय अधिकारी श्रीमती सविता शेप मॅडम, श्रीमती डॉ. शीला कांबळे वैध्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र चिंचोली,




सौ. पुष्पा साबळे मॅडम, शाखा व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक चिंचोली माळी, कु. दिपाली राजेंद्र राऊत,यशस्वी युवा उद्योजीका, सौ. शुभांगी गोविंद ढवारे, जिएसटी अधिकारी, नवीन मुंबई, श्रीमती सुप्रिया बनकर, कनिष्ठ सहाय्यक प. स. केज, सौ. सोनाली राजाभाऊ राऊत, ग्रामविकास अधिकारी मैंदवाडी घागरवाडा, सौ. प्रतिभा महारुद्र लिगाडे, सामाजिक कार्यकर्त्या, श्रीमती अनुसया वायबसे, बीड जिल्हाध्यक्ष अंगणवाडी संघटना. तसेच उपस्थित सर्व माता पालकांचा व श्री संस्कार इंग्लिश स्कूल च्या सर्व महिला कर्मचाऱ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.यावेळी सर्वप्रथम स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ, स्त्री शिक्षणाच्या शिल्पकार क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,

# अनिकेत ॲग्रो सर्व्हिसेसचे मालक गंगाधर गोरे यांचे कडून चापड गाव जिल्हा परिषद शाळा बालमंचासाठी दिले ५१ हजाराचे छत

दैनिक वादळ वार्ता
**शेवगाव । प्रतिनिधी**

शेवगाव तालुक्यातील चापडगाव येथील प्रगतशील शेतकरी युवा उद्योजक अनिकेत ॲग्रो सर्व्हिसेस फर्मचे मालक मा गंगाधर गोरे यांनी चापडगाव जिल्हा परिषद शाळेच्या बालमंचावर दैनिक परिपाठ, फॅशन , वक्तृत्व ,कला, काव्य, नाटय व विशेष सांस्कृतिक उपक्रम साजरे करण्यासाठी ५१ हजार रुपयांचे भक्कमछत देऊन विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात व शाळेच्या वैभवात मोलाची भर घातली.

गंगाधर गोरे हे चापडगाव जिल्हा परिषद शाळेचे मितभाषी माजी विद्यार्थी असून आपल्या मनगटातील ताकदीवर व परिश्रमावर विश्वास ठेवत अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून मार्गक्रमण करीत स्वतःची शेती फुलवित



शेतकऱ्यांना माफक दरात कृषी सेवा पुरविण्यासाठी व्यवसायाला सुरुवात केली . शाळेच्या बांधकामावर श्रमदान करणारा सामान्य मजूर ते अनिकेत ॲग्रो सर्व्हिसेसचा मालक असा दैदिप्यमान यशस्वी प्रवास आहे . ज्याशाळेत शिकलो त्या संस्काराची खाण असलेल्या शाळेचे उत्तरदायित्त्व म्हणून सामान्य विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यासाठी व्यासपीठावर भक्कम छत उपलब्ध करून दिले आहे

भविष्यात ग्रामीण भागातील युवक युवतींनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यामातून आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविण्यासाठी मित्र परिवाराच्या सहकार्यातून सामान्य ज्ञानाची पुस्तके, ,अभ्यासिका, वाचनालय व ग्रंथालय उभारण्याचा त्यांचा मानस असून हा उपक्रम ग्रामीण भागातील विद्यार्थी युवक युवतींना ही एक प्रेरक संजीवनी देणारा ठरणार आहे याबद्दल मुख्याध्यापक, ,शिक्षक ,ग्रामस्थ, सरपंच, उपसरपंच , शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य,सोसायटी चेअरमन व्हाईस चेअरमन संचालक मंडळ सर्व समिती सदस्य व प्रंचक्रोशीतील नागरिकां कडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .

# पनवेल पंचायत समितीवर भाजपचे वर्चस्व

## उपसभापतीपदी भूपेंद्र पाटील यांची बिनविरोध निवड



दैनिक वादळ वार्ता
**पनवेल । प्रतिनिधी**


पनवेल तालुका पंचायत समितीच्या राजकारणात ऐतिहासिक बदल घडला असून पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाचे कमळ या समितीवर फुलले आहे. भाजपच्या वतीने आदई गणातून निवडून आलेले भूपेंद्र सदानंद पाटील हे उपसभापती विराजमान झाले आहेत. अनेक दशकांपासून पंचायत समितीवर असलेला शेतकरी कामगार पक्षाचा एकछत्री अंमल आता संपुष्टात आली आहे. या निवडीनंतर घोषणा, ढोलताशा आणि फटाक्यांच्या जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली. यावेळी आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. विजय अद्भुतपूर्व असला तरी या विजयी जल्लोषात विनम्रपणा स्पष्टपणे जाणवत होता. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, महापौर नितिन पाटील, माजी सभागृहनेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, युवा नेते प्रितम म्हात्रे यांच्यासह इतर नेतेमंडळी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी सभापती, उपसभापती यांचे अभिनंदन केले. त्यानंतर मार्केट यार्ड येथे त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. उपसभापतीपदी निवड झालेले युवा नेते भूपेंद्र पाटील यांनी मागील टर्ममध्ये पंचायत समिती सदस्य म्हणून सक्षम व प्रभावी काम केले आहे. जनसंपर्काची उत्तम जाण आणि युवा संघटनाची मजबूत पकड ही त्यांच्या कार्याची जमेची बाजू मानली जाते.

# सुरक्षित शहरासाठी 'जेंडर सेन्सिटिव्ह' नियोजनाची गरज; विधान परिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांचे आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात प्रतिपादन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

अरविंद बनसोडे कुरनूरकर आज दि.१३: मुंबईची परंपरा ही कष्टकरी महिलांची आहे. एकेकाळी रात्रीच्या वेळी रस्त्यांवर केवळ पुरुषांचे वर्चस्व असायचे, मात्र आज मुंबईतील महिलांनी ते चित्र बदलले आहे. सिद्धिविनायकाकडे जाण्यासाठी रात्रीच्या वेळी चालत जाणाऱ्या महिला किंवा रात्रीच्या शिफ्टवर काम करणाऱ्या महिला हे दर्शवतात की,आजया शहराच्या सार्वजनिक जागा आता महिलांनी स्वतःच्या हक्काच्या केल्या आहेत, असे गौरवद्गार महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी काढले.तसेच या महिलांच्या सुरक्षिततेसाठी पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक गुंतवणूक या विषयावरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात त्या प्रमुख वक्त्या म्हणून (दि.१२मार्च)रोजी बोलत होत्या. यावेळी त्यांनी जागतिक प्रतिनिधींसमोर महाराष्ट्रातील महिला धोरणांचा प्रभावी प्रवास मांडला.डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी आवर्जून नमूद केले की, महाराष्ट्राने देशाला पहिले महिला धोरण दिले आणि त्यानंतर आलेल्या चारही महिला धोरणांच्या प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. केवळ धोरण कागदावर असून चालत नाही, तर त्याची अंमलबजावणी जमिनीवर होणे आवश्यक आहे. २०१२ च्या दिल्लीतील घटनेनंतर (निर्भया प्रकरण) समाजात मोठी जागृती झाली, पण दर १० वर्षांनी एक नवीन पिढी येते, ज्यांच्यापर्यंत हे कायदे आणि हक्क पोहोचवणे आमचे कर्तव्य आहे, असे त्या म्हणाल्या.आपल्या अधिकारांचा महिलांच्या कल्याणासाठी कसा वापर होतो, याचे उदाहरण देताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, मी विधान परिषदेची उपसभापती म्हणून जेव्हा गृहमंत्री, मुख्यमंत्री किंवा शिक्षण मंत्र्यांना महिलांच्या सुरक्षेबाबत निर्देश देते, तेव्हा त्यांना ते गांभीर्याने घेतात. उपसभापती या घटनात्मक पदावर असल्याने माझ्या सूचनांचे रूपांतर शासन निर्णयात होते आणि प्रशासन त्या तत्परतेने स्वीकारते, याबद्दल मी सरकारचे मनापासून आभार मानते.एसटी बसमध्ये रात्रीच्या वेळी दिवे (Lights) सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, जेणेकरून छेडछाडीच्या घटनांना आळा बसेल.केवळ पायाभूत सुविधा सुधारून चालणार नाही, तर पोलिसांची मानसिकता बदलण्यासाठी सातत्याने जेंडर ट्रेनिंग (ऋशपवशी ढीरळपळपस) देण्यावर त्यांनी भर दिला.महिलांची सुरक्षा हा केवळ पोलीस विभाग किंवा एका खात्याचा विषय नाही, तर तो गृह, वाहतूक, शिक्षण, आरोग्य, परिवहन आणि नगरविकास अशा सर्व विभागांचा एकत्रित अजेंडा असावा. यासाठी मी ६ विभागांची संयुक्त बैठक घेऊन 'सेफ्टी मेनस्ट्रीमिंग' (सुरक्षेचे मुख्यप्रवाहीकरण) करण्याचा आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत, त्या आराखड्यात नाहीला संघटनांनी दिलेल्या सर्व्हेक्षणातील मुद्देही समाविष्ट केले आहेत असे सांगत त्यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात तिराणा (अल्बेनिया) च्या महापौर अनवेला रस्तादी आणि लागोस (नायजेरिया) च्या बिम्बोला अकिनाजो यांनीही त्यांच्या शहरातील अनुभव मांडले.या चर्चेत 'सेफ्टीपिन' (Safetipin) च्या कल्पना आणि सोनाली व्यास यांनी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून सुरक्षित शहरांचे नकाशे तयार करण्याच्या पद्धतीवर प्रकाश टाकला.

चर्चेत अल्बानिया देशातील तिराणा शहराच्या महापौर अनुएला रिस्तानी, व्यवस्थापकीय संचालक अबीम्बोला अकिनाजोसेफ्टी पिन' कार्यक्रम संचालक, सोनाली व्यास, न्यूयॉर्कमधील कांता सिंग, लॅटिन अमेरिकेतील ॲना फालू, प्रिया वर्धराजन, वेदा भारद्वाज आणि नंदिता शहा यांनी सहभाग घेतला होता.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077